# प्रधानमंत्री किसान मानधन योजना

## थोडक्यात माहीती



श्री. सोमनाथ गावडे, M.Sc (Agri), Diploma in MCJ
कृषि अधिकारी, ता.कृ.अ कार्यालय,
वेल्हे, जि.पुणे, मो.नं.८३०८३०३९९३
Email- somnathgawade25@gmail.com

## या योजनेची मुख्य उद्दिष्टे

१. प्रधानमंत्री किसान मानधन योजना देशातील सर्व लघु व सीमांत शेतकरी यांना सामाजिक सुरक्षा देण्याच्या दृष्टीने दि. ०९/०८/२०१९ पासून सुरु झाली आहे.

२. लघु व सीमांत शेतकरी यांच्याकडे वृद्धावस्थेत खूपच कमी बचत असते किंवा कधी- कधी ती ही असत नाही. अशा वेळी पुढील जीवन व्यतीत करण्यासाठी त्यांच्या कडे काहीच साधन नसते.

३. या योजनेचा मूळ उद्देश असा आहे की, जेंव्हा हे शेतकरी वृद्धावस्थेत जातील तेंव्हा त्यांना अर्थ सहाय करणे जेणेकरून ते एक स्वास्थ्यपूरक तसेच आनंदी जीवन जगू शकतील.

४.या योजनेच्या अंतर्गत पात्र लाभार्थी यांना दरमहा रु.३००० निवृत्ती मानधन दिले जाईल.

५. ही ऐच्छिक आणि अंशदान आधारित निवृत्ती मानधन योजना आहे.

६. ही योजना भारतीय जीवन विमा निगम यांच्या द्वारे व्यवस्थापित(Manage) केली असून त्यांच्यावतीने चालविली जाणार आहे.

७. लघु व सीमांत शेतकरी यांना रु.५५ ते २०० पर्यंत पेन्शन निधी मध्ये अंशदान जमा करावे लागेल. हे अंशदान वयाच्या ६० वर्षापर्यंत (सेवानिवृत्ती च्या दिनांकापर्यंत) जमा करावे लागेल.

८. केंद्र सरकार लाभार्थीने पेन्शन निधी मध्ये जमा केलेल्या रक्कमे इतकेच योगदान जमा करेल.

९. जे लघु व सीमांत शेतकरी वय वर्षे १८ – ४० या वयोगटातील आहे ते या योजनेमध्ये सहभाग घेण्यासठी पात्र राहतील.

१०. लघु व सीमांत शेतकरी पती- पत्नी हे या योजनेमध्ये स्वतंत्ररीत्या भाग घेवून वय वर्षे ६० नंतर  दरमहा स्वतंत्रपणे रु.३००० पेन्शन घेण्यासाठी अधिकृत असतील.

११. काही कारणास्तव एखाद्या सहभागी शेतकऱ्यास या योजनेतून  बाहेर पडायचे असल्यास त्याने भरलेल्या निधीची रक्कम व्याजासह त्यास परत मिळते.

१२. सेवानिवृत्ती पूर्वी एखाद्या सहभागी शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यास मृत शेतकऱ्याचा पती किंवा पत्नी सहभागी मृत शेतकऱ्याच्या ६० वय वर्षापर्यंत निधी जमा करू शकतील.

१३. किंवा सदर सहभागी मृत शेतकऱ्याच्या पती/पत्नीला ही योजना चालू ठेवावी वाटत नसेल तर त्या मृत शेतकऱ्याने जमा केलेला निधी हा व्याजासह त्याचा पती/पत्नीला परत मिळतो.

१४. सेवानिवृत्तीपूर्वी सहभागी शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या पती/पत्नीस ५०% किंवा १५०० रु. प्रतिमाह मिळतात.

१५.सहभागी शेतकरी हा पी-एम किसान योजनेचा लाभार्थी जरी असला तरी या योजनेमध्ये लाभ घेण्यास तो पात्र राहील. एकाच बँक खात्यात हे दोन्हीही लाभ घेता येतील.

१६. जे पात्र शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ इच्छीतात त्यांनी आपले सरकार केंद्रावर (कॉमन सेवा केंद्र) जावून या योजनेत सहभागी होऊ शकतात.

१७. आवश्यक कागद पत्रे- आधार कार्ड, बँक पासबुक, ७/१२, ८ अ

१८. सदर योजनेत नाव नोंदवण्यासाठी जवळच्या आपले सरकार केंद्रावर (कॉमन सेवा केंद्र) जावून नि:शुल्क सहभाग नोंदवा.

## विचारले जाणारे संभाव्य प्रश्न आणि उत्तरे

१.  प्रधानमंत्री किसान मान-धन योजना(PMKMDY) काय आहे ?

- ही देशातील सर्व लघु व सीमांत शेतकऱ्यांसाठी पेन्शन स्कीम असून ती ऐच्छिक व अंशदायी स्वरुपाची आहे. या मध्ये १८ ते ४० वर्षे वयोगटातील व्यक्ती समाविष्ठ होऊ शकते.  वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर प्रतिमाह रु.३००० इतकी मासिक पेन्शन सुरु होते.

२. लघु व सीमांत शेतकऱ्याची काय व्याख्या आहे ?

- ज्यांचे क्षेत्र २ हे.( ५ एकर) पेक्षा कमी आहेत असे शेतकरी.

३.या योजनेमध्ये सहभागी होण्याचे काय फायदे आहेत?

- १. न्यूनतम सुनिश्चित पेन्शन
  २. कुटुंब पेन्शन –

४. या योजनेमध्ये लाभ घेण्यासाठी कोण पात्र आहे?

**-पात्रता-** वय वर्षे १८-४० वयोगटातील लघु व सीमांतक शेतकरी (दि.०१/०८/२०१९ च्या स्थितीला अनुसरून)

**अपात्रता-** १. राष्ट्रीय पेन्शन योजना, कर्मचारी राज्य विमा योजना,कर्मचारी भविष्य निधि योजना किंवा इतर तत्सम संविधानिक सुरक्षेच्या योजनेमध्ये सहभागी लघु व सीमांत शेतकरी

२.जे शेतकरी श्रम व रोजगार मंत्रालय द्वारा संचालित प्रधानमंत्री श्रम योगी मानधन(PM-SYM)व प्रधानमंत्री लघु व्यापारी मानधन योजनेमध्ये समाविष्ठ आहे.

३. बहुभुधारक, माजी- आजी संवैधानिक पद ग्रहण करणारे, माजी-आजी मंत्री/राज्यमंत्री, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा,विधानपरिषद सदस्य, माजी-आजी महापौर, जि.प.अध्यक्ष

४. इन्कम टॅक्स भरणारे व्यक्ती, डॉक्टर, वकील,इंजिनियर, सी.ए, वास्तुकार इ.

५. केंद्र/ राज्य शासनातील कर्मचारी/ अधिकारी (अपवाद- गट-ड, वर्ग-४ व बहुउद्देशीय काम करणारे कर्मचारी)

५. या योजनेत लाभ घेण्यासठी निर्धारित केलेली अंतिम दिनांक काय आहे?

-०१.०८.२०१९

६. वैयक्तिक अंशदान रक्कम किती असणार आहे?

- रु.५५ ते २००प्रतिमाह (तक्त्याचे अवलोकन करावे)

| Entry Age | Superannuation Age | Member's contribution (Rs.) | Government's contribution (Rs.) | Total contribution (Rs.) |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 18 | 60 | 55 | 55 | 110 |
| 19 | 60 | 58 | 58 | 116 |
| 20 | 60 | 61 | 61 | 122 |
| 21 | 60 | 64 | 64 | 128 |
| 22 | 60 | 68 | 68 | 136 |
| 23 | 60 | 72 | 72 | 144 |
| 24 | 60 | 76 | 76 | 152 |
| 25 | 60 | 80 | 80 | 160 |
| 26 | 60 | 85 | 85 | 170 |
| 27 | 60 | 90 | 90 | 180 |
| 28 | 60 | 95 | 95 | 190 |
| 29 | 60 | 100 | 100 | 200 |
| 30 | 60 | 105 | 105 | 210 |
| 31 | 60 | 110 | 110 | 220 |
| 32 | 60 | 120 | 120 | 240 |
| 33 | 60 | 130 | 130 | 260 |
| 34 | 60 | 140 | 140 | 280 |
| 35 | 60 | 150 | 150 | 300 |
| 36 | 60 | 160 | 160 | 320 |
| 37 | 60 | 170 | 170 | 340 |
| 38 | 60 | 180 | 180 | 360 |
| 39 | 60 | 190 | 190 | 380 |
| 40 | 60 | 200 | 200 | 400 |

७. असत्य घोषणा पत्र करून एखादा व्यक्ती या मध्ये सहभागी झाला तर काय होईल?

- त्या व्यक्तीने भरलेले अंशदान विना व्याज परत केले जाईल व केंद्र शासनाचे तेवढ्याच प्रमाणत असणारे योगदान थांबवले जाईल.

८. २ हे. पेक्षा जास्त क्षेत्र असणारे शेतकरी सहभागी होऊ शकतात का?

- नाही.

९. ७/१२ वर नाव नसलेले शेतकरी या मध्ये सहभागी होऊ शकतात का?

- नाही

१०.या योजनेत सहभागी होण्यासाठी आवश्यक माहिती व कागदपत्रे काय आहेत?

- शेतकरी पती/पत्नीचे नाव
  जन्म तिथी
  बँक खाते क्रमांक
  मोबाईल नंबर
  आधार नंबर
  ७/१२, ८ अ

११. या योजनेचा पेन्शन कोष व्यवस्थापक कोण असेल?
-भारतीय जीवन विमा निगम (LIC)

१२. या योजनेत भरावयाचे अंशदान पीएम-किसान मधून प्राप्त होणाऱ्या लाभातून भरता येईल का?
-हो.

१३. मासिक अंशदान देय तारीख काय असणार आहे?
- नावनोंदणीची तारीख, अंशदान तिमाही,चारमाही किंवा सहामाही स्वरूपातही भरता येईल.

१४.आपले सरकार केंद्र(कॉमन सेवा केंद्र) पेन्शन कार्ड केंव्हा देईल
- सर्व प्रपत्रे भरल्यानंतर अंशदान भरणाऱ्या शेतकऱ्याची आवश्यक तेथे स्वाक्षरी घेवून पेन्शन कार्ड मिळनेकामी पुढील प्रक्रिया केली जाईल.

१५. आपले सरकार सेवा केंद्रामध्ये नाव नोंदणी साठी किती शुल्क लागणार आहे ?

- नि: शुल्क

१६. चुकीच्या बँक खाते क्र. किंवा इतर बाबत दुरुस्तीसाठी काय करता येईल?

- आपले सरकार सेवा केंद्रामध्ये जाऊन बदल करता येतील.परंतु कुठल्याही परिस्थितीमध्ये जन्म दिवस बदलता येणार नाही.

१७. या योजनेमध्ये कम्यूटेशन ची काही सोय आहे का?

- नाही

१८. या योजनेत नोमिनी कशा प्रकारे समाविष्ठ व बदलता येतील?

- ऑनलाईन किंवा आपले सरकार केंद्रावर जाऊन कितीही वेळा नोमिनी बदलता येतील.

१९. समीक्षा, देखरेख आणि तक्रार निवारण प्रक्रियेसाठी कुठे संपर्क साधावा ?

सचिव (किसान कल्याण), कृषि सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, कृषि भवन, नवी दिल्ली-११०००१

# पंतप्रधान किसान मानधन योजना नोंदणी फ़ॉर्म

| | |
|---|---|
| शेतकऱ्याचे नाव | |
| मोबाईल नंबर | |
| गाव | |
| तालुका | |
| जिल्हा<br>राज्य | |
| पिन कोड | |
| जन्म दिनांक | |
| स्त्री / पुरुष | |
| संवर्ग | खुला / अ.जा. / अ.ज. / इमाव / अल्पसंख्यांक |
| बँक खाते नंबर | |
| IFSC नंबर | |
| बँकेचे नाव व शाखा | |
| आधार नंबर | |
| नामनिर्देशन करावयाच्या व्यक्तीचे नाव | |
| नामनिर्देशीत व्यक्तीचा जन्म दिनांक | |
| नामनिर्देशीत व्यक्तीशी नाते | आई / वडील / भाऊ / बहीण |

____________________________

शेतकऱ्याची सही



मा.नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

Digital India
Power To Empower

CSC
e-GOVERNANCE SERVICES INDIA LIMITED

सत्यमेव जयते
कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय
भारत सरकार

आपले सरकार



मा.देवेंद्र फडणविस
मुख्यमंत्री

# प्रधानमंत्री किसान मानधन योजना

## छोट्या व मध्यम शेतकऱ्यांसाठी निवृत्तीवेतन योजना

? एक प्रश्न विचारा स्वतःला...
बळीराजा ला जगाचा पोशींदा म्हणतात. पण हाच पोशींदा म्हतारपणात रोजींदा खर्चाला महाग असतो. त्यांच म्हतारपण आरामात जावं असं नाही वाटत?

आमच्या शेतकरी राजाचं म्हातारपण,
टेंशन मध्ये नाही तर पेंशन मुळे आनंदी बनेल.



आयुष्यभर मेहनत करणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्यांना
वयाच्या ६० व्या वर्षानंतर
दर महीना रु ३०००/- पेंशन मिळेल
थेट आपल्या बँक खात्यावर.
पती पत्नी सुध्दा सहभाग घेवू शकतील.

* अटी व नियम *
वयः १८ ते ४०
मासिक उत्पन १५०००

सर्व शेतकऱ्यांनी
आपल्या गावातील (CSC) आपले सरकार
सेवा केंद्रात आपण आवेदन करु शकता.

* आवश्यक कागदपत्रे *
आधार कार्ड
बँक पासबुक
७/१२, ८ अ

शेतकऱ्यांच्या सेवार्थ
कृषि विभाग



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## शेतकऱ्यांच्या सुरक्षित भवितव्यासाठी

# प्रधानमंत्री शेतकरी मानधन योजना



श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

## योजनेच्या अटी

- ऐच्छिक आणि अंशदायी निवृत्तीवेतन योजना
- १८ ते ४० वर्ष वयोगटातील शेतकरी
- दोन हेक्टर पेक्षा कमी जमीन असणाऱ्यांना लाभ सहभागी शेतकऱ्यांना वयाच्या ६० वर्षापर्यंत दरमहा ५५ ते २०० रुपये अंशदायी रक्कम जमा करावी लागणार
- ६० वर्ष पूर्ण झालेल्या शेतकऱ्याला दरमहा ३ हजार रुपये निवृत्तीवेतन
- शेतकऱ्यांनी जमा केलेल्या रकमे एवढीच रक्कम केंद्र शासन जमा करणार
- भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या (एलआयसी) माध्यमातून निवृत्तीवेतन थेट बँक खात्यात जमा होणार
- लाभार्थी शेतकऱ्याच्या मृत्युनंतरही कुटुंब निवृत्तीवेतन मिळणार

**अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना दरमहा मिळणार निवृत्तीवेतन**

### अर्ज करण्याचे ठिकाण

आपले सरकार केंद्र

### आवश्यक कागदपत्रे

आधारकार्ड, बँकेचे पासबुक, ८अ खाते उतारा



**कष्टकरी शेतकरी, लाखोंचा पोशिंदा, नको आता भविष्याची चिंता...**

कृषी विभाग

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## शेतकऱ्यांच्या सुरक्षित भवितव्यासाठी

# प्रधानमंत्री शेतकरी मानधन योजना



श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री



श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

### अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना दरमहा मिळणार निवृत्तीवेतन

**अर्ज करण्याचे ठिकाण**

आपले सरकार केंद्र

**आवश्यक कागदपत्रे**

आधारकार्ड, बँकेचे पासबुक, ८अ खाते उतारा




## योजनेच्या अटी

- ऐच्छिक आणि अंशदायी निवृत्तीवेतन योजना
- १८ ते ४० वर्ष वयोगटातील शेतकरी
- दोन हेक्टर पेक्षा कमी जमीन असणाऱ्यांना लाभ सहभागी शेतकऱ्यांना वयाच्या ६० वर्षापर्यंत दरमहा ५५ ते २०० रुपये अंशदायी रक्कम जमा करावी लागणार
- ६० वर्ष पूर्ण झालेल्या शेतकऱ्याला दरमहा ३ हजार रुपये निवृत्तीवेतन
- शेतकऱ्यांनी जमा केलेल्या रकमे एवढीच रक्कम केंद्र शासन जमा करणार
- भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या (एलआयसी) माध्यमातून निवृत्तीवेतन थेट बँक खात्यात जमा होणार
- लाभार्थी शेतकऱ्याच्या मृत्युनंतरही कुटुंब निवृत्तीवेतन मिळणार

**कष्टकरी शेतकरी, लाखोंचा पोशिंदा, नको आता भविष्याची चिंता...**

कृषी विभाग

मी आशा करतो की, पात्र शेतकरी बंधू, भगिनी या योजनेत सहभागी होतील आणि इतर ही पात्र शेतकऱ्यांना सहभागी होण्यास उद्युक्त करतील.



# धन्यवाद